
ई-साहित्य प्रकाशन
अंक क्रमांक ४५
दिनांक २७ सप्टेंबर २००९



- संपादक मंडळ -
अहं ब्रह्मास्मि (पुणे)
भारती सरमळकर (मुंबई)
स्वप्ना कोल्हे (नाशिक )
सोनाली घाटपांडे (पुणे )
सचिन काकडे (मुंबई )

**संपादकीय**

या अंकामध्ये आपणास वाचायला मिळणार आहेत अनेक ह्दयस्पर्शी कविता या कवितांमधून समान जाणारं एक सुत्र नसेल कदाचित पण प्रत्येक कविता एकदम सच्ची आहे हा विश्वास मला आहे.

**सुमन** च्या कवितेतील मोग-याची फुलं वाचणा-या प्रत्येक मनावर आपला सुवास कोरून जातील यात शंकाच नाही. **सचिन** तर अगदी खात्रीने सांगतोय की "ती" येणार, जिथे त्याला कविता सुचते तिथे एखाद्या प्रेयसीने न यावे केवळ अशक्यच.

मराठीतील उगवते प्रतिभावंत गझलकार **जगदिश पाटील** आणि **प्रशांत पोरे** यांच्या जगण्यावर भाष्य करणा-या तुफ़ान गझला, **भूराम,रणजीत, प्रणव** यांच्या तरल कविता तुम्हाला मराठी कवितांच्या प्रेमात पाडल्यावाचून राहणार नाहीत. आणि या फ़क्कड मेजवानीवर स्वीट डिश असायलाच हवी... आपल्या सर्वांचा आवडता कवि **प्राजक्त देशमुख** याची 'फ़ाटकी डायरी' वाचलीच पाहिजे.

या कवितांचे सर्व हक्क त्या त्या कविंकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत. नेटाक्षरी ही चळवळ मराठी कवितेच्या प्रसारासाठी सतत राबत असून यातून संपादकांना आत्मसमाधानाशिवाय इतर कोणताही वैयक्तिक लाभ होत नाही. आपणही हा अंक आपल्या इतर मराठी बांधवांपर्यंत पोहचवून मराठी भाषेच्या या कार्यास हातभार लावाल ही अपेक्षा.

- **आनंद माने**
  **संपादक नेटाक्षरी**

## मोग-याची फुलं

मोग-याची फुलं तिच्या ओंजळीत टाकीत
तो म्हणाला
" सदैव अशीच दरवळत रहा....."

तीने त्याच्याकडे पाहिलं
हसली ..
बहरली ..
गहिवरली ....

कोमेजली......

डोळे मिटले,
त्या मोग-याच्या फुलांना डोळ्याला लावलं
श्वासभरून त्यांचा सुगंध घेतला
आणि
ती फुलं त्याला परत देत
कसंसच हसून म्हणाली

"मी तर रातराणी
माझ्या नशिबी मोगरा नाहीय रे ....."

**सुमन परब (मुंबई)**

## कधी ना कधी

कधी ना कधी तु येशील तेथे
मला कविता सुचते जेथे..।।

सांज तेथली असे कोवळी
दिसे जराशी निळी-सावळी
भिर-भिर फ़िरते..
अन, लहरी धरते...
ओंजळ भरते
त्या थेंबांनी
अर्घ्य स्मृतींचे
निळ्या सागरा लिहून देते
खुळ्या मनाचे लिखाण जेथे
कधी ना कधी तु येशील तेथे.....।।

तिथे आठवे तुझा किनारा..
अबोल वारा, जरा शहारा..
उगाच पाणी..
डोळ्यांमधुनी..
तुझी कहानी
त्या एकांतातून
वेडी संध्या
तुझ्याविना का तुला वाचते?
जिथे अंतरी ओल साचते
कधी ना कधी तु येशील तेथे...।।

**- सचिन काकडे (मुंबई)**

## आयुष्या

आणशी इतके कुठोनी पेच आयुष्या
रोजचे जगणे तुझे का हेच आयुष्या ?

आज आनंदात थोडेसे जगू दे रे
मग उद्याला जायचे आहेच आयुष्या ?

'दुःख तू देऊ नको' हे सांगणे नाही
पाउली प्रत्येक का पण ठेच आयुष्या ?

एकतर्फ़ी प्रेम करण्याचा गुन्हा झाला
मी खुळा अन प्रेमही वेडेच आयुष्या?

श्वासही नियमीत मी घेतो तुझ्यासाठी
भासती का स्पंदने ठोकेच आयुष्या?

फ़ारशी चिंता अता माझी नको तुजला
घाव नेमाने तरीही देच आयुष्या

तू मला सोडून जाण्याची भिती नाही
चालले आहे जीणे नुसतेच आयुष्या

चाळता पाने जुनी पाणावले डोळे
हाय, झाले काय हे भलतेच आयुष्या

ठोकरा देतोस त्या खाऊनही हसतो
आजही म्हणतो तुला माझेच आयुष्या

**- जगदिश पाटील (पुणे)**

## तो घन - मी मन

तो मन धुक्याच्यावेळी
स्निग्ध चांदणी झाला
क्षण आवरता आवरता
तो किती लाघवी आला

घन-अंधारातून त्याच्या
विश्वात मी कोसळलो
व्रण थेंब थेंब वाळूचा
कोरडा शोषूनी व्यालो

मी निळ निळ माथ्याची
ती अशी उधळून देतो
डोळ्यात, पापणी काठा
तो तसाच बिलगूनी येतो

मी उठतो पाण्यावरती
तरंग जणू घन-भारी
तो हिरव्या वाटेवरला
प्रवास होई जरतारी

मी रंग रंग आवरता
देहात गलथून जातो
तो थेंब थेंब सावरता
ओलावा कलथून देतो

मी मोह मोह यात्रीचा
वाटेस उलथून देतो
तो स्नेह स्नेह धात्रीचा
ह्रदयात उमटून जातो

ही गर्द धुक्याची वेळ
हा श्वास कोंडता वारा
तो घन दाटता भोवती
नयनात मोकळ्या धारा

तो घन दाटता भोवती
नयनात मुक्तल्या धारा...

- **भूराम**
**( भूषण महाजन, अमेरिका)**

## गझल

जीवन माझे तरल असावे, सरल असावे
जीवन माझे फ़क्त हमेशा गझल असावे

कोठून मिळाल्या जगण्याच्या या आकांक्षा?
जगण्याचे उत्प्रेरण माझे गझल असावे

आता वाटे जन्मच माझा तुझियासाठी
जन्मोजन्मी दैवत माझे गझल असावे

कणकण माझ्या या देहाचा क्षणक्षण झिजतो
या झिजण्याचे कारण देवा गझल असावे

केंव्हा केंव्हा वाटत असते मज भगवंता
आजाराचे औषध माझ्या गझल असावे

अर्थच माझ्या आयुष्याचा उमगे मजला
हसणे, रडणे आणिक जगणे गझल असावे

- **प्रशांत पोरे (पुणे)**

नेटाक्षरी

## बाहुल्या तिच्या माझ्या

दर्शवती खूणा समाधानाच्या
बाहुल्या तिच्या माझ्या..

रंग उधळती प्रेमाचा
बाहुल्या तिच्या माझ्या

उडती पाखरासवे आभाळी
बाहुल्या तिच्या माझ्या

सरींमध्ये मिसळती 'सरी'
बाहुल्या तिच्या माझ्या

देती उभारी कोसळताना
बाहुल्या तिच्या माझ्या

क्षण कैक ओलाव्याचे
बाहुल्यात तिच्या माझ्या..

- **प्रणव मराठे (मुंबई)**

## अर्थ नाही

काल केलेल्या चुकांच्या बोचण्याला अंत नाही
आज केल्या व्यक्त ज्या त्या भावनांना अर्थ नाही

डोलत्या फ़ांदीतूनी सांडून झाला जो सडा हा
वेचलेल्या त्या फुलांच्या हासण्याला अर्थ नाही

कोण कुठली पाखरे येतात येथे खेळण्याला
किलबिलाटातील त्यांच्या गायनाला अर्थ नाही

हेही माझे तेही माझे चोहोबाजू मांडलेले
ठायी ठायी गुंतलेल्या वासनेला अर्थ नाही

दाटुनी आभाळ येता प्राण डोळा आणलेले
मेघ जाता वाहुनी त्या दाटण्याला अर्थ नाही

- **रसप ( रणजीत पराडकर )**

**फ़ाटकी डायरी**

खिळखिळ्या झालेल्या सुटया डायरीच्या
पानांना
क्रमवार लावणं अवघड नव्हतं तसं...

पडले होते ज्यावर
कट्टयावरच्या सिगारेटचे उष्टे थोटूक
ते सर्वात आधी

ओली पानं त्यानंतर
मित्रांसोबत पावसातल्या हैदोसाची

ज्यावर नक्षीकाम करून
चांगलं अक्षर काढण्याचा प्रयत्न आहे ती पानं
'ती'ला पहिल्यांदा पाहिल्या वरची

नंतर

बराच वेळ नंतरची तारिख शोधावी
लागेल.....
मध्यंतरी वेळच नव्हता लिहिण्याचा.....

चुरगाळलेली...
अर्धवट फ़ाडलेली..
गझल अर्धवट लिहुन सोडलेली पानं..
.
.
सर्वात शेवटी......

खिळखिळ्या झालेल्या सुटया डायरीच्या
पानांना
क्रमवार लावणं अवघड नव्हतं तसं...

- **प्राजक्त देशमुख ( नाशिक )**

रसिकांना नेहमी उत्तमोत्तम आणि नवनवीन काव्य पुरविण्याचा ई-साहित्य प्रकाशनाचा ध्यास 'नेटाक्षरी' जोमाने पार पाडत आहे. दर आठवडयात मिळणा-या तुमच्या प्रतिसादांनी आमचा उत्साह द्विगुणीत होतोय, नेटाक्षरी हा साप्ताहिक अंक सध्या सुमारे ४०००० मराठी रसिकांना विनामूल्य वितरीत केला जातो. त्या व्यतिरिक्त वेबसाईट्वर व्हिजिट करुन वाचणा-यांची संख्या लक्षणीय आहे. हा अंक आपण आपल्या ईष्टमित्रांना फॉरवर्ड करण्यास आमची काही हरकत नाही

netaksharee@gmail.com / www.netaksharee.com